RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक १६(३)] मंगळवार, जून १६, २०२६/ज्येष्ठ २६, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**—महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. .. पृष्ठे १-५

**नियोजन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ जून २०२६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. VIII OF 2026.**

**AN ORDINANCE**

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT, 1977.

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८.**

**महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९७८ चा महा. २०. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र रोजगार हमी (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,- १९७८ चा महा. २०.

(१) खंड (अ-१) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :-

"(अ-१) "केंद्रीय अधिनियम" याचा अर्थ, विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) : व्ही बी - जी आर ए एम जी (विकसित भारत - जी राम जी) अधिनियम, २०२५, असा आहे; " ; २०२५ चा ३६.

(२) खंड (अ-२) वगळण्यात येईल ;

(३) खंड (इ-२) वगळण्यात येईल ;

(४) खंड (जे) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

"(जे-१) "अनुसूची" याचा अर्थ, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची, असा आहे; " ;

(५) खंड (ल) ऐवजी, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(ल) "राज्य परिषद" याचा अर्थ, कलम ४ अन्वये घटित केलेली महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी परिषद, असा आहे; " ;

(६) खंड (ल) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईलः-

(ल-१) "राज्य स्तरावरील सुकाणू समिती" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ४-अ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली राज्यस्तरीय सुकाणू समिती, असा आहे; " ;

(७) खंड (म-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :-

"(म-२) "महाराष्ट्र राज्य व्ही बी - जी राम जी निधी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम १२-अ अन्वये घटित केलेला रोजगार व आजीविका हमी अभियानाकरिता महाराष्ट्र राज्य विकसित भारत हमी निधी योजना, असा आहे;".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, "कलम ३ च्या पोट-कलम (१)" या मजकुराऐवजी, "कलम ५ च्या पोट-कलम (१)" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मधील, "कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपेक्षा" या मजकुराऐवजी, "कलम ५ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीव्यतिरिक्त" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३-अ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३-अ मध्ये, पोट-कलम (२) मधील, "लोकभाषेतील वृत्तपत्र असेल" या मजकुरानंतर, "तसेच राज्य शासन, असा सारांश राज्य शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा कोणत्याही नियुक्त डिजिटल प्लॅटफॉर्मवर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे जनतेला उपलब्ध करून देईल" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३-क ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३-क मध्ये,—

(१) पोट-कलम (१) मधील, "कलम ६" या मजकुराऐवजी, "कलम १०" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (१) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईलः-

"परंतु, वेतन दराची अतिरिक्त रक्कम, विविध प्रकारच्या अकुशल अंगमेहनतीच्या कामांसाठी आणि विविध क्षेत्रांसाठी राज्य शासन अधिसूचित करू शकेल.".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मध्ये,- सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ४ ची सुधारणा.

(एक) पोट-कलम (१) मधील, "महाराष्ट्र राज्य रोजगार हमी परिषद" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र राज्य ग्रामीण रोजगार हमी परिषद" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(दोन) समासटिपेतील मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईलः-

"राज्य ग्रामीण रोजगार हमी परिषद.".

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईलः- सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० मध्ये कलम ४-अ समाविष्ट करणे.

"**४-अ.** (१) राज्य शासन, योजनेच्या अंमलबजावणीचे प्रचालनात्मक मार्गदर्शन, समन्वयन आणि सनियंत्रण यांकरिता एक राज्यस्तरीय सुकाणू समिती घटित करील. राज्यस्तरीय सुकाणू समिती.

(२) पोट-कलम (१) अन्वये घटित केलेल्या राज्यस्तरीय सुकाणू समितीचे अध्यक्षपद, राज्याचा मुख्य सचिव किंवा राज्य शासनाद्वारे नामनिर्देशित केलेला अपर मुख्य सचिवापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी भूषवील आणि ती पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेलः-

(अ) संबंधित विभागाचा प्रधान सचिव किंवा सचिव;

(ब) संचालक किंवा आयुक्त (योजनेचा प्रभारी)

(क) राज्य शासनाच्या संबंधित विभागांचे प्रधान सचिव किंवा सचिव;

(ड) राज्य शासन निर्धारित करील, इतके विषय तज्ज्ञ;

(ई) तंत्रज्ञान किंवा संशोधन संस्थांचे प्रतिनिधी; आणि

(फ) ग्राम विकास विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी नामनिर्देशित केलेला एक सदस्य.

(३) राज्यस्तरीय सुकाणू समिती-

(अ) इतर कार्यक्रमांबरोबर राज्यव्यापी नियोजन आणि अभिसरण यांचे पर्यवेक्षण करील;

(ब) जिल्हा कामगिरीचा आढावा घेईल आणि एकत्रित राज्य योजनेच्या तयारीची वेळेवर सुनिश्चिती करील;

(क) राष्ट्रीय स्तरावरील सुकाणू समितीसोबत समन्वय साधील आणि तिच्याकडून दिलेल्या निदेशांची अंमलबजावणी करील;

(ड) डिजिटल प्रणाली, सनियंत्रण व्यवस्था यांस साहाय्य करील आणि राज्यस्तरावरील सुधारणांची प्रक्रिया करील; आणि

(ई) राज्य शासनाद्वारे तिला नेमून देण्यात येतील, अशी अन्य कार्ये पार पाडील.".

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२-अ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईलः- सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १२-अ ऐवजी दाखल करणे.

महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधी.

"**१२-अ.** (१) राज्य शासन, केंद्रीय अधिनियमाच्या कलम २२ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधी, या नावाने एक निधी घटित करील. अशाप्रकारचा निधी हा, कलम १२ अन्वये घटित केलेल्या रोजगार हमी निधीचा भाग असणार नाही.

(२) केंद्रीय अधिनियमाच्या कलम ३० अन्वये मिळालेली कोणतीही रक्कम आणि केंद्रीय अधिनियमाच्या कलम २२ च्या पोट-कलम (७) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे राज्य शासनाचे अंशदान हे, महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधीमध्ये जमा करण्यात येईल.

(३) महाराष्ट्र राज्य व्ही बी-जी राम जी निधीमध्ये जमा असलेली रक्कम या अधिनियमाच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनार्थ राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधीन राहून ग्रामीण क्षेत्रांमध्ये खर्च करण्यात येईल.

(४) महाराष्ट्राच्या व्ही बी-जी राम जी राज्य निधीचे विहित करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा प्राधिकरणाकडून राज्य शासनाच्या वतीने धारण करण्यात येईल व त्याचे व्यवस्थापन करण्यात येईल.

(५) केंद्रीय अधिनियमाअन्वये योजनेअंतर्गत हाती घेतलेले काम पूर्ण झाल्यावर, जर त्या पूर्ण झालेल्या कामाचे अधिक कुशल काम करण्यासाठी, उक्त कामाच्या तांत्रिक गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी किंवा मूल्यवर्धन करण्यासाठी काम हाती घेणे आवश्यक असेल तर, राज्य शासन आवश्यकतेनुसार पूरक निधी पुरवील किंवा अभिसरणाची तरतूद करील.".

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १४-क ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४-क मधील,

(एक) "एक हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी, "दहा हजार रुपयांपर्यंत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) "केंद्रीय अधिनियमाच्या कलम २७" या मजकुराऐवजी, "केंद्रीय अधिनियमाच्या कलम २९" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१०.** (१) या अध्यादेशाद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे मुख्य अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना, कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, ती अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट असल्याचे दिसून येईल त्याप्रमाणे, या अध्यादेशाच्या तरतुदींशी विसंगत नसतील अशा तरतुदी **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो, काढल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ ( १९७८ चा महा. २० ) ( यात यापुढे ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम" असा केला आहे ) हा, राज्याच्या ग्रामीण क्षेत्रांत, अकुशल अंगमेहनतीचे काम करण्यासाठी ज्या कुटुंबातील प्रौढ व्यक्ती स्वतः होऊन तयार असतील अशा सर्व प्रौढ व्यक्तींना रोजगाराची हमी देऊन त्यांना काम मिळण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी परिणामकारक तरतुदी करण्यासाठी अधिनियमित करण्यात आला आहे. उक्त अधिनियमाअन्वये विविध रोजगार हमी योजना राज्यात यशस्वीरीत्या राबविण्यात आल्या आहेत.

**२.** महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमाच्या धर्तीवर, ग्रामीण क्षेत्रांमध्ये अकुशल रोजगाराची हमी देणारा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ ( २००५ चा ४२ ) हा संसदेद्वारे अधिनियमित करण्यात आला आहे. मनरेगा अधिनियमाच्या कलम २८ मध्ये, इतर गोष्टींबरोबरच, अशी तरतूद आहे की, जेथे ग्रामीण कुटुंबाला रोजगार हमी देण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असा राज्य अधिनियम अस्तित्वात असेल किंवा अधिनियमित केला गेला असेल, ज्या अंतर्गत रोजगाराच्या अटी या अधिनियमांतर्गत हमी दिलेल्या अटींपेक्षा कमी दर्जाच्या नसतील, तेथे राज्य शासनाला स्वतःचा अधिनियम राबविण्याचा पर्याय असेल. ग्रामीण क्षेत्रांतील अकुशल कामाच्या रोजगार हमीबाबत मनरेगा अधिनियमातील तरतुदींच्या तुलनेत महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमामध्ये अधिक फायदेशीर तरतुदी समाविष्ट आहेत. म्हणून, मनरेगा अधिनियम अधिनियमित झाल्यानंतरही, उक्त कलम २८ नुसार सुयोग्य सुधारणा करून तो मनरेगा अधिनियमाशी सुसंगत केल्यानंतर, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम राज्यात अंमलात असण्याचे चालू राहिले.

**३.** विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण): व्ही बी- जी आर ए एम जी ( विकसित भारत - जी राम जी ) अधिनियम, २०२५ ( २०२५ चा ३६ ) हा संसदेद्वारे अधिनियमित करण्यात आला असून त्याच्या कलम ३७ मध्ये मनरेगा अधिनियम निरसित करण्याची तरतूद आहे. अधिक लाभदायी राज्य अधिनियम लागू असणे चालू ठेवण्याबाबत व्ही बी- जी राम जी अधिनियमाच्या कलम ३० मध्ये मनरेगा अधिनियमाच्या कलम २८ मधील तरतुदींसारख्याच तरतुदी समाविष्ट आहेत. म्हणून, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम अंमलात असण्याचे चालू राहण्यासाठी, उक्त कलम ३० च्या तरतुदींनुसार तो व्ही बी- जी राम जी अधिनियमाशी सुसंगत करणे आवश्यक असल्याने, महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियमात सुधारणा करणे आवश्यक आहे.

**४.** राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

**जिष्णु देव वर्मा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

मुंबई,
दिनांक १६ जून २०२६.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आप्पासो धुळाज,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.